**ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेताना पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांकः टंचाई-१००९/प्र.क्र. १३१/पापु-१४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट,२००९

**संदर्भ:- १) शा. नि, पा.पु. व स्व.वि. क्र.टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दि. १/२/१९९९**
**२) शा. नि, पा.पु. व स्व.वि. क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दि. ३/२/१९९९**

प्रस्तावना:-

ग्रामीण भागात ज्या गावात / वाडयांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असेल म्हणजेच ज्या ठिकाणी दरदिवशी २० लि. प्रतिडोई या पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल व जेथे १.५ कि.मी.च्या परिसरात पाण्याचा उद्भव नसेल तेथे पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत उपाययोजना राबविण्यबाबत वरील संदर्भाधीन दिनांक १/२/१९९९ व ३/२/१९९९ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या उपाययोजना ठरविताना त्या गावातील/वाडीतील लोकसंख्येला लागणा-या पाण्याच्या गरजेबाबत केवळ विचार करण्यात येतो. त्या गावातील/वाडीतील पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज टंचाई निवारण उपाययोजना ठरविताना विचारात घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ग्रामीण भागात ज्या गावात / वाडयांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असेल तेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारण उपाययोजना राबविताना त्या गावातील/वाडीतील लोकसंख्येबरोबरच पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेऊन उपाययोजना राबविण्यात यावी.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी
शाखा:- C.B
आवक नं.:-
का. नं.:-2
10 SEP 2009
तहसिलदार उप जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी

D:\WS14DO\CR 2009\WATER SUPPLY ANIMALS.doc

२.  हा शासन निर्णय मदत व पुनर्वसन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३..  हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००९०८२७१२४५४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. वि. कोळेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
१५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती, पापु-१४